# मराठी रंगभूमीवरील आजचे संगीत दिग्दर्शन

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - केसरी वर्तमानपत्र, संपा. जयंतराव टिळक, १९७६, २५ एप्रिल)

मराठी कलाजीवनातील आजचा महत्त्वाचा कलाप्रकार म्हणजे नाटक, याविषयी फारसे दुमत होणार नाही. प्रत्यक्षतः रंगभूमीवर येणारी व न येणारी नाटके, नवीन नाटककार, नट, संगीतकार यांचे चेहरे, जुन्या संस्था इत्यादींचे नवे मोहरे, रंगभूमीविषयक वादविवाद या साऱ्यांचे वाढते प्रमाण रंगभूमीच्या जागतेपणाचा नसला तरी जिवंतपणाचा पुरावा होय. अशा परिस्थितीत रंगभूमीच्या शक्य तेवढ्या अंगांची शक्य तेवढी कसोशीची चर्चा होणे उपकारक ठरण्याचा बराच संभव आहे. या दृष्टीने संगीताचे अंग तपासण्याचा हा एक प्रयत्न.

रंगभूमीच्या संगीताविषयी सर्वसाधारणपणे परिस्थिती नक्कीच आशादायक आहे. 'ते आवाज', 'त्या चाली', 'ती नाटके' इत्यादी हळवे उद्गार हळवे म्हणून स्वीकारावयाचे. आजच्या रंगभूमीचे हे न्याय्य मूल्यमापन म्हणून नाही. अभिषेकी, चंदावरकर, अशोक पत्की, यशवंत देव, श्रीनिवास खळे इत्यादींची वाटचाल वेधक आहे आणि अर्थपूर्णही. या व यासारख्या इतरांच्या कार्याची तपशीलवार चर्चा करण्यासारखी आहे.

**चतुर संगीत-दिग्दर्शक**

पहिला मुद्दा असा की, आजचा संगीत-दिग्दर्शक हळूहळू कमी सोवळा होतो आहे. प्रायोगिक पार्श्वसंगीत, गाणी देणे, नृत्यरचनेला अनुकूल संगीत देणे इथपासून ते केवळ ध्वनीची रचना करणे इथपर्यंत सारा आपलाच प्रांत आहे अशी त्याची भूमिका आहे. नवे-जुने, प्रायोगिक-धंदेवाईक या अवस्थांना कडवेपणे चिकटून न राहता प्रामाणिकपणे संगीत-दिग्दर्शकाची भूमिका पार पाडणे शक्य आहे असा त्याचा विश्वास आहे. तडजोड या शब्दाला समीक्षेत अपशब्दाची जागा मिळाली आहे. पण रंगभूमीच्या काही आविष्कारांना व जातींना साधावयाचे कार्य इतके वेगळे असते की, त्यामुळे आवश्यक असणारे संगीतही संमिश्र गरजांची पूर्ती करणारे असावे लागते. ते कार्यक्षम असावे लागते. जाहिरातींच्या कामांना जसे चित्रकलेपेक्षा वेगळे निकष लागतात तसे इथे होते. या संगीताचेही एक स्थान असते. कानांना भरून टाकणारे, चालींच्या गोडपणापुरते दक्ष असणारे, लक्ष खिळवून टाकण्यासाठी चमत्कृती करणारे, शिष्ट आणि सामान्य प्रेक्षकांत ज्याची 'फॅशन' त्या तऱ्हेची वाद्ये, ध्वनिमुद्रण-तंत्रे इत्यादी वापरणारे संगीत समाजाच्या काही सांगीतिक गरजा पुऱ्या करते हेही संगीत द्यावयास एक प्रकारचा चतुरपणा लागतो आणि तो आजच्या संगीत-दिग्दर्शकांत नक्कीच आहे.

**पुढचे पाऊल**

या चतुरस्रपणाचे एक अंग जरा अधिक विस्ताराने पाहिले पाहिजे. आजच्या संगीत-दिग्दर्शकाला संगीताची व्याख्या अधिक व्यापक करावीशी वाटू लागल्याच्या अभिनंदनीय खुणा दिसू लागल्या आहेत. खऱ्या अर्थाने पार्श्वसंगीत गंभीरपणे समोर येऊ पाहत आहे. यात पुन्हा एरवी सहजासहजी सांगीतिक म्हणून मान्य न होणाऱ्या वाद्यांचा उपयोग अधिकाधिक करण्यास आजचा संगीत-दिग्दर्शक उत्सुक असतो. कधी केवळ लयवाद्ये, कधी केवळ मानवी आवाज तर कधी केवळ ध्वनीसंगीताइतक्याच कसोशीने, मोजून

मापून आणि योजनाबद्धतेने वापरणे, गंभीरपणे त्याचा प्रयोग करणे, संगीताच्या व्यापक व्याख्येशिवाय शक्य झाले नसते. संगीताच्या जाळ्यांत ध्वनि पकडणेसुद्धा आपले कार्य, अशा निष्कर्षाला पोहोचणे हे निश्चितपणे पुढचे पाऊल आहे. संगीतप्रकार म्हणून मान्य झालेल्या आविष्कारातील तऱ्हेतऱ्हेचे प्रकार योजकतेने वापरणे म्हणजे संगीत-दिग्दर्शनाबाबतीतली पहिली कोंडी फोडणे होय.

आजच्या संगीत-दिग्दर्शकाच्या भोवतालच्या परिस्थितीचा त्याच्यावर एका बाबतीत अनुकूल परिणाम झाला आहे. चित्रपट, आकाशवाणी इत्यादीच्या ध्वनिमुद्रण वगैरे तंत्रांचा कुशल वापर करण्याची संधी मिळाल्यामुळे त्याला संगीत देत असताना संगीताच्या परिणामकारकतेवर तंत्रदृष्ट्या लक्ष केंद्रित करणे शक्य झाले आहे. ध्वनिमुद्रण करून मग त्याचे एडिटिंग करणे, त्यात प्रतिध्वनी वगैरेंचा वापर करणे, संगीताचा ध्वनिरंग श्रोत्यांच्या अंगावर येईल असे परिणाम साधणे यांचा त्याला शक्तिस्थानांसारखा प्रत्यय येऊ लागला आहे. प्रकाश-योजना, नेपथ्य यांचा फिजिकल इम्पॅक्ट होणे, डोळे दिपून जाणे याचा अनुभव येतो, हे आता संगीताच्या बाबतीतही घडू लागले आहे.

संगीत-दिग्दर्शकाच्या हातात एक शस्त्र आले आहे. लोकांना गुंग करून टाकण्याची साधने संख्येने व सामर्थ्याने जबरदस्त आहेत आणि त्यांच्यामुळे एका नव्या कौतुकाचा, कुतूहलाचा ताजेपणा त्याच्या कल्पनाशक्तीला लाभला आहे. जास्त विस्ताराने हा मुद्दा स्वतंत्रपणे चर्चेला घेण्यासारखा आहे. पण मुख्य बाब थोडक्यात सांगण्यासारखी आहे. नाट्याखेरीज इतर कलांमध्ये संगीताचा वावर कसा होतो आणि त्या कला वा ती माध्यमे त्यासाठी काय काय तंत्रे हाताळतात याकडे सक्रिय आस्थेने आजच्या रंगभूमीचा संगीत-दिग्दर्शक पाहतो आहे. ही देवाण-घेवाण नि:संशयपणे प्रचंड शक्यतांची आहे. विसावे शतक जनतासंपर्क माध्यमांचे आहे. माध्यमांना वापरण्याचा एक अतिशय महत्त्वाचा मार्ग म्हणजे त्यांना कलाविष्काराच्या कामाला जुंपणे. ही गोष्ट आता घडू लागली आहे.

**हाकाटीचे दुष्परिणाम**

तंत्रसंभार पेलावयाचा म्हणजे अंतःशक्ति, स्फूर्ती, आतला आवाज यावर विसंबणे अशक्यच. यामुळे आजचा संगीत-दिग्दर्शक अधिक विचार करू लागला आहे. हा विचार दोन तऱ्हांचा आहे. एक तर आपण विशिष्ट संगीत का देतो व कसे देतो याविषयीची संगीत-दिग्दर्शकाची स्वतःची अशी कमीअधिक स्पष्ट भूमिका असण्याचा संभव वाढता आहे. अजूनही अर्थात आपण विचार करतो, त्यामागे काही भूमिका, काही निश्चित तंत्रांचा सूबुद्ध व सहेतुक वापर असतो हे मांडणे त्याला पंडिती वाटते! ढोबळ, संदिग्ध, गूढवादी भाषेचा मोह इतर अनेकांप्रमाणे त्यालाही सुटलेला नाही! पण आज ना उद्या तो सोडावा लागणार याची जाणीव झाल्याची चिन्हे दिसत आहेत. मुख्यतः अशिक्षित कलावंतांनी आणि तर्कशुद्धता व तर्ककर्कशता यांना एकच समजणाऱ्या सुशिक्षितांनी पांडित्य आणि कलात्मता यांच्यात अंतर्विरोध असल्याची वर्षानुवर्षे हाकाटी केल्याचे दुष्परिणाम अजून आपल्याला भोवत आहेत. संगीत-दिग्दर्शक अजून या छायेतून बाहेर पडायचे आहेत.

नाट्य आणि नाटक याविषयीच्या त्यांच्या जाणिवेतही बदल झाला आहे. नाटककार, दिग्दर्शक यांच्याचइतका संहितेचा विचार संगीत-दिग्दर्शकाने करावा हा प्रकार वाढता आहे. आपले संगीत हे नाटकात नेमके कसे असणार याविषयी तो अधिक सावधान आहे. ब्रेख्तचे तंत्र वापरून, म्युझिकल कोलाजचे तंत्र वापरून संगीत देऊ पाहणारे दिग्दर्शक नाट्य आणि संगीत यांचा संबंध अधिक गुंतागुंतीचा आहे हे जाणत असतात. खुद्द नाटक हाच प्रकार अधिक समजून घेणे त्यांना जरुरीचे वाटते. संवादांमध्ये चाली पेरणे हे आपले काम नसून नाट्याच्या प्रवाहाला समांतर असा संगीताचा प्रवाह खेळता ठेवणे हे आपले उद्दिष्ट आहे अशी त्यांची धारणा आहे. संगीत-दिग्दर्शक हाही नाटकाचा एक अर्थ लावत असतो ही मूलभूत जाणीव संगीत-दिग्दर्शकाची भूमिका अधिक अर्थपूर्ण झाल्याचे निदर्शक होय. त्याचे संगीत, संगीत म्हणून नाटकाच्या अंग-प्रत्यंगात मुरण्याचा संभव यामुळे वाढता राहतो. संवादांची लय,

भाषाशैलीचा पोत यासारख्यांना विचारात घेऊन संगीतयोजना करणे आज गृहीत धरता येत नसले तरी अपेक्षिता येते. नाट्य ही संयोगी कला आहे याचा अर्थ केवळ वेगवेगळ्या कला त्यात वापरात येतात असा नाही. वेगवेगळ्या कला एकमेकांची सामर्थ्य स्थाने आणि कलात्म उद्दिष्टे यांचा अंदाज घेऊन सहेतुकपणे वावरतात म्हणून नाट्य ही संयोगीकला असा याचा अर्थ आहे. संगीत-दिग्दर्शक हा नाट्याचा घटक आज जास्त सुजाण होत आहे.

**शक्यतांचा शोध**

आधी येऊन गेलेल्या एका मुद्द्याचे दुसरे एक अंगही विचारात घेणे आवश्यक आहे. नाटकाचा संगीतदिग्दर्शक आज चित्रपट, टी. व्ही. या इतर माध्यमातही वावरण्यास बिचकत नाही. या माध्यमांच्या मागण्या अजूनपर्यंत वेगळेपणे जाणवू लागल्या नाहीत म्हणून असो किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी असो, तो सगळीकडे उत्साहाने काम करतो. वास्तविक पाहता वेगवेगळ्या माध्यमांना लागणारे संगीतही वेगवेगळ्या रूपाने अवतरणे जरूर असल्याने सर्व माध्यमांना पुरे पडण्यासाठी खूपच कसोशीने आणि कसदारपणे काम करणे जरूर आहे. यासाठी संगीताचा विचार, व्यवहार, आचार साऱ्यांचेच वळण बदलणे आवश्यक आहे; अशी गरज आज भासत नाही. याचा अर्थ विविध माध्यमेच अजून आपापल्या तंत्राविषयी वगैरे जरा चाचपडत आहेत. त्यांना आपापले स्वत्व जाणवल्यावर संगीत-दिग्दर्शकाला केवळ उत्साह पुरा पडेल असे वाटत नाही. माध्यमांच्या वाढीच्या काळात मात्र - उत्साह असणारी माणसे माध्यमांच्या अवतीभवती असलेली बरी. कारण यामुळे त्यांच्या शक्यतांचा शोध घेण्याबाबतीतली वाटचाल होत राहते.

माझ्या मते आताचा कालखंड संगीत-दिग्दर्शकाच्या दृष्टीने फार उत्तेजक आहे. त्याला अनेक वाटा मोकळ्या आहेत. आणि नाटकद्वारा श्रोते, अभिनेते या सर्वांचे सहकार्य मिळण्याच्या दृष्टीनेही फार अनुकूल वातावरण आहे. कारण गाण्याचा प्रत्येक घटक नावीन्य, मौलिकता, प्रायोगिकता इत्यादींच्या शोधासाठी उद्युक्त झाल्याचे आज दिसून येत आहे. याचा फायदा संगीत-दिग्दर्शकाने काही बाबतील, काही प्रमाणात घेतला आहे. याचे काही बरे-वाईट परिणामही दिसून आले आहेत. या परिणामांचे मूल्यमापन हा स्वतंत्र विचाराचा विषय होऊ शकेल.